# कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नगरपरिषद दुबे रुग्णालय ईमारत, पहिला मजला, आदर्श विद्यामंदिर रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व) कुळगांव, पिन-४२१५०३, ता.अंबरनाथ जि.ठाणे.
ईमेल:- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in. वेबसाईट:- http://kbmc.gov.in

जा. क्र./कु-ब.न.प./नरवि/बां.प./६१०१ /२०१८-२०१९ युनिक नं. ७१ दिनांक : २१ / ०१ /२०१८

प्रति,

श्रीमती.कांताबाई पां.म्हसकर व इतर पाच, श्री.सुदाम ग.ईरमाळी व इतर आठ
तसेच श्रीमती.लक्ष्मीबाई द.म्हसकर व इतर तेरा यांचे कु.मु.प.धारक मे.निना डेव्हलपर्स
व मे.निना बिल्डर्स तर्फे भागीदार श्री.हसमुख के.पटेल व श्री.जगदीश कांतीलाल पटेल,
द्वारा श्रीमती एस.आर.खंबायत (वास्तुशिल्पकार) कुळगांव- बदलापूर.

विषय : गट.नं.९०/१, ९१/१अ, १०१/६, १०२, १०३ व ११३, मौजे वालिवली,ता.अंबरनाथ, येथे बांधकाम करण्याच्या सुधारीत मंजूरी बाबत.

संदर्भ : आपला दि. २०/२/२०१८ रोजीचा अर्ज क्र.३१०९

श्रीमती एस.आर.खंबायत (वास्तुशिल्पकार) कुळगांव- बदलापूर, यांचे मार्फत सादर केलेले अर्ज.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.

गट.नं.९०/१, ९१/१अ, १०१/६, १०२, १०३ व ११३, मौजे वालिवली,ता.अंबरनाथ, मध्ये १४३९०.०० चौ.मी. भूखंडामध्ये प्रोत्साहनात्मक तरतुदीनुसार एकूण अनुज्ञेय क्षेत्र १८३७९.५७ चौ.मी. पैकी अस्तित्वातील क्षेत्र १२७६३.७० चौ.मी. व नव्याने प्रस्तावित ५६१०.७८ चौ.मी. असे एकूण १८३७४.४८ चौ.मी. नियोजित क्षेत्र भूखंडाच्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि.२०/२/२०१८ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत ------- रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे,स्टिल्ट/पहिला मजला/दुसरा मजला /तिसरा मजला/चौथा मजला/पाचवा मजला/सहावा मजला/सातवा मजला/आठवा मजला/नववा मजला/दहावा मजला/राहणेसाठी/वाडे भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, सुधारीत बांधकाम परवाना/प्रारंभ प्रमाण पत्र देण्यात येत आहे. ( प्रस्तावित टाईप जी - स्टिल्ट - दहा मजले, टाईप एफ विंग सी व विंग डी-भाग स्टिल्ट,तळ + सात मजले)

-:अटी:-

१. ही बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नूतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नूतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखडयाच्या अनुशंगाने छाननी करण्यात येईल.

२. नकाशात----------------- रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३. मा.जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर राहील व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेकडे पाठविणे आवश्यक राहिल.

४. बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

५. ही परवानगी आपल्या मालकीच्या कबजातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

६. बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटी प्रमाणे करता येईल. जोत्यापर्यत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्या बाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.

७. भूखंडाचे हद्दीत भोवती मोकळा सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

८. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरची बांधकाम परवानगी रद्द झाली असे समजण्यात येईल.

९. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची हमी (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपल्या वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.

१०. बांधकाम पुर्णतेचा दाखला / वापर परवानगी घेतल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये त्यासाठी जागेवर ज्याप्रमाणे बांधकाम पुर्ण झाले आहे त्याचा नकाशा वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांच्या विहीत नमुन्यातील दाखल्यासह (५ प्रतीत) इतर आवश्यक कागद पत्रासह सादर करण्यात यावा.

११. बांधकाम चालू करण्यापूर्वी नगर भूमापन अधिकारी / भूमी अभिलेख खात्याकडून जागेची आखणी करुन